महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मासं/रवका/न.क्र.५/९१५७
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी
रोड,माटुंगा, मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दि.२७.०३.२०२३

# परिपत्रक

**विषय: "जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा" हे "महाराष्ट्राचे राज्यगीत" म्हणून स्विकारण्यात आल्याबाबत- त्याअनुषंगाने कंपनीच्या सर्व स्तरावर अंगीकृत करणेबाबत.**

**संदर्भ:-** १) शासन निर्णय क्र. संकीर्ण १४२३/प्र.क्र.१२/कार्या-३१ (राजशिष्टाचार) दि.०१.०२.२०२३.
२) शासन पत्र क्र. संकीर्ण ८२२३/प्र.क्र.९७/सांका४/ दि.०२.०२.२०२३.
३) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२३७/ऊर्जा-२ दि.१५.०२.२०२३.

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" चे औचित्य साधून राज्यातील तरुणाई तसेच समाजातील सर्वच नागरीकांना स्फुर्तीदायक असणारे तसेच महाराष्ट्राच्या शौर्याचे वर्णन करणारे, कविवर्य श्री. राजा नीळकंठ बढे यांचे लिखित "जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा" या गीतामधील दोन चरणांचे गीत "महाराष्ट्राचे राज्यगीत" म्हणून संदर्भीय शासन निर्णय क्र. ०१ अन्वये स्विकारण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून "जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा" हे दि.१९.०२.२०२३ पासून संदर्भीय शासन पत्र क्र. ०२ अन्वये "महाराष्ट्राचे राज्यगीत" अंगिकारण्यात आलेले आहे. या राज्यगीताच्या गायन / वादन संदर्भातील मार्गदर्शक सुचना संदर्भीय शासन पत्र क्र. ०३ अन्वये कंपनीमध्ये पालन करण्यास निर्देशित केलेले आहे.

२. सबब, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दि.०१.०२.२०२३ च्या धर्तीवर "जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा" हे "महाराष्ट्राचे राज्यगीत" तसेच, सोबत जोडलेले शासन पत्र दि.०२.०२.२०२३ मध्ये नमुद राज्यगीत गायन / वादन संदर्भातील मार्गदर्शक सुचनांचे पालन कंपनीतील सर्व प्रशासकीय व क्षेत्रीय कार्यालय स्तरावर स्विकारण्यास व लागू करण्यास सक्षम अधिकारी यांनी मंजूरी प्रदान केलेली आहे.

३. यास्तव, महावितरण कंपनीतील सांघिक व सर्व क्षेत्रीय कार्यालयीन स्तरावर संबंधीत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय व पत्रामधील सुचनांचे अवलोकन करून त्याबाबत आपल्या स्तरावर योग्य अंमलबजावणी करण्यात यावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत:** १) शासन निर्णय दि. ०१.०२.२०२३
२) शासन पत्र दि.१५.०२.२०२३

(भूषण कुलकर्णी)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)